दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS L&T INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक २०२ वा शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# विधानसभेचे निकाल अविश्वसनीय

मुंबई : प्रतिनिधी विधानसभा निवडणुकीचे निकाल महाराष्ट्रातील कोणालाही पटलेले नाहीत. जे निवडून आले आहेत त्यांनाही विश्वास बसत नाही. लोकसभेच्या निवडणुकीनंतर अवघा चार महिन्यात एवढा बदल होऊच शकत नाही. शरद पवार यांच्या पक्षाचे अवघे १० आमदार निवडून येतात व अजित पवार यांच्या पक्षाला ४१ जागा मिळतात हे महाराष्ट्रातील कोणालाही पटलेले नाही, असे सांगताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज विधानसभा निवडणुकीत गडबड झाल्याच्या विरोधकांच्या आरोपांमध्ये आपलाही सुर मिसळला.

लोकांनी मनसेला मतदान केलेय,पण ते आपल्यापर्यंत पोचलेले नाही,असा आरोप त्यांनी केला. भाजपचे नेते भेटायला आले म्हणजे त्यांच्याबरोबर युती होईल, असे समजू नका, हे स्पष्ट करताना राज ठाकरे यांनी भाजपावरही खरपूस टीका केली.

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम घोटाळा झाल्याचा आरोप करत माहविकास आघाडीच्या शंभरहून अधिक उमेदवारांनी न्यायालयात धाव घेतली आहे. भाजपाशी मधुर संबंध असलेल्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आज पक्ष पदाधिका-यांच्या मेळाव्यात बोलताना विधानसभेचे निकाल अनाकलनीय, अविश्वसनीय असून, महाराष्ट्रातील कोणालाही ते पटलेले नसल्याचे सांगितले. विधानसभा निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर महाराष्ट्रात सन्नाटा होता.

जे जिंकले त्यांनीही जल्लोष केला नाही. कारण त्यांचाही विश्वास बसत नव्हता. जे निवडून आले आणि सत्तेत आहेत त्यांचे मला अनेकांचे फोन आले त्यांनाही शॉक बसला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित एक व्यक्ती मध्यंतरी मला भेटली. त्यांनाही हा निकाल पटला नव्हता. मनसेचे राजू पाटील यांच्या मतदारसंघात १४०० लोकांचे एक गाव आहे. दरवेळी त्यांना



तेथे मोठे मतदान होते. त्या गावात त्यांना यावेळी एकही मत मिळाले नाही. एकही मत मिळत नाही, यावर कसा विश्वास ठेवणार ? काँग्रेसचे बाळासाहेब थोरात सातवेळा निवडून आले. ७०-८० हजारांनी निवडून यायचे. यावेळी १० हजार मताने पराभूत झाले.

## शिकतांनाच जीवनाला शिस्त लावा-श्री .सुनिल लांजेवार

छत्रपती संभाजी नगर/ प्रतिनिधी :- ३० जानेवारी २०२५ रोजी वसंतराव नाईक महाविद्यालयाश्रच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन माननीय श्री .सुनीलजी लांजेवार , पोलीस उपाधीक्षक , छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते पार पडले .याप्रसंगी संस्थेचे सचिव नितीनजी राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन दीप प्रज्वलन करून झाले. स्वागत गीतानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले .स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. अनिल जामकर यांनी प्रास्ताविक केले.



या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय शिंदे यांनी २०२४-२५ चा वार्षिक आवाहाल सादर केला व वर्षातील विविध कार्यक्रम व उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख पाहुणे श्री.सुनील लांजेवार यांनी विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला चांगला निर्णय सोने करु शकतो म्हणून कॉलेज काळात शिस्त ठेवा . जबाबदारीने वागा . ह्या संवेदनशील वयात ध्येयापासून विचलित करणारी माध्यमे खूप जास्त असून कठोर परिश्रमाला पर्याय नाही असा संदेश दिला. संस्थेचे सचिव श्री .नितीन जी राठोड यांनी अध्यक्षीय समारोप करतांना स्नेहसंमेलन मनावरील ताण दूर करते त्यामुळे त्याचा आनंद घ्यावा अशा शुभेच्छा दिल्या . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी प्रणिता आघाडे आणि कुमारी धनश्री अमृतकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय कु. गीता जाधव हिने तर आभार प्रदर्शन विद्यार्थी संसद सचिव जीवन राठोड याने केले.

## शाळेच्या पदाधिकाऱ्यानी केलेल्या सहृदय सत्काराने पानावले माजी विद्यार्थी भ. सू. खरात यांचे डोळे

बुलढाणा / प्रतिनिधी :- विद्यार्थ्यांच्या जीवनात शाळा हा खूप महत्त्वाचा घटक असतो. आपल्या शाळेतील विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊन स्वतःचा नावलौकिक करत असताना शाळेचाही नावलौकिक करावा व शाळेचा गौरव वाढवावा या भावनेने गुरुजन वर्ग माजी विद्यार्थ्यांकडून अपेक्षा व्यक्त करतात असतात. असाच एक सुखद व आनंददायी सोहळा श्री. शिवाजी विद्यालय, किन्होळा ता. चिखली जि. बुलढाणा येथे घडला भ. सू. खरात गुरुजी हे किन्होळा येथील शिवाजी विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांचे मन सामाजिक जाणीवांनी ओतपोत भरलेले असल्यामुळे आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या उक्तीप्रमाणे त्यांनी आपल्या शाळेशी आजही ऋणानुबंधाचे नाते जोडून ठेवले आहे. ही नाळ अधिक घट्ट विणत असताना गेल्या तीन वर्षापासून त्यांनी सातत्याने विविध महापुरुषांच्या नावाने वेगवेगळ्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी , बारावी ,स्कॉलरशिप परीक्षेत अनुक्रमे प्रथम,द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध बक्षीस स्वरूपात स्वतःच्या



पेन्शन मधून मिळणाऱ्या रकमेतून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळविण्यासाठी बक्षीस देत असतात. आतापर्यंत त्यांनी २३१०० /- रुपयाची बक्षीस रक्कम एकूण ५४ विद्यार्थ्यांना वाटप केलेली आहे. या कार्याची दखल म्हणून संस्थेने भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात श्री. शिवाजी विद्यालयात आपल्या शाळेचा माजी विद्यार्थी भ.सु. खरात हे चांगले काम करतात म्हणून त्यांचा संस्थेचे संचालक राजेश बाहेकर व प्राचार्य राजेश्वर सुसर यांनी शाल व श्रीफळ देऊन सहृदय सत्कार केला. बालपणीच्या आपल्याच शाळेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या व प्राचार्यांच्या हस्ते सत्कार स्वीकारत असताना भ. सू. खरात गुरुजी यांचे डोळे पाणावले होते. शाळेने दाखवलेले हे प्रेम कधिही न विसण्या सारखे आहे. या सत्कार प्रसंगी भ. सू. खरात यांनी भविष्यात देखील विविध महापुरुष यांच्या जीवन चरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धा घेऊन त्यात अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना यथाशक्तीप्रमाणे बक्षीस देण्यात येतील असा मनोदय व्यक्त केला. यावेळी विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ, पालक बंधू भगिनी व विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. हिंगे सर यांनी केले व आभार प्राचार्य राजेश्वर सुसर यांनी मानले.

## गुणवत्तापूर्ण कामातून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणार-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

### जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा







लातूर :- जिल्हा वार्षिक योजनेसोबतच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त निधी मिळविण्याचा प्रयत्न राहणार असून यामाध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यात येईल. जिल्ह्यात प्रगतीपथावर असलेली, तसेच नव्याने सुरु होणारी विकासकामे गुणवत्तापूर्ण होतील, याची संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी. जिल्हा वार्षिक योजनेतील कामे विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या. तसेच जिल्हावासियांसाठी अतिशय महत्वाचे असलेल्या जिल्हा रुग्णालयाच्या जमिनीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून लवकरच निधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री ना. भोसले बोलत होते. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, पालक सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी झाले होते.

प्रारंभी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी प्रास्ताविकामध्ये सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून झालेल्या खर्चाची व सन २०२५-२६ मध्ये प्रस्तावित कामांची माहिती दिली. तसेच जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी जिल्हा नियोजन समिती विविध योजनानिहाय खर्चाची, तसेच प्रस्तावित निधी, पुनर्विनियोजन प्रस्ताव याबाबत माहितीचे सादरीकरण केले.

कृषिपंपासाठी सुरळीत वीज पुरवठा हा अतिशय महत्वाचा विषय आहे. ग्रामीण भागातील विद्युत रोहित्र विषयक तक्रारीं सोडविण्याला प्राधान्य द्यावे. विद्युत भार वाढल्यामुळे नादुरुस्त होणाऱ्या विद्युत रोहीत्रांची यादी तयार करून त्यांची क्षमता वाढविणे, वीज वितरणचे सुरळीत होण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री ना. भोसले यांनी दिल्या. एखादे रोहित्र नादुरस्त झाल्यानंतर त्याठिकाणी पर्यायी रोहित्र तातडीने उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी औसा तालुक्यात सुरु करण्यात आलेला 'पॉवर ऑन व्हील' हा उपक्रम जिल्ह्यात सर्वत्र राबवावा, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित कामे विहित कालावधीत पूर्ण करावीत. उपलब्ध करून दिलेल्या निधीतून अधिकाधिक गुणवत्तापूर्ण आणि लोकोपयोगी कामे करून आपल्या जिल्ह्याच्या विकासाला गती द्यावी. या कामांमध्ये कोणताही गैरप्रकार किंवा हयगय होणार नाही, याची दक्षता संबंधित विभाग प्रमुखांनी घ्यावी, असे पालकमंत्री ना. भोसले म्हणाले.

यावेळी सर्व लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यातील सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरूपी व्यवस्था, रस्ते विकास, आरोग्य व्यवस्था, जलजीवन मिशन, सिंचन प्रकल्प व तलाव, बंधारे यांची दुरुस्ती, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, प्रधानमंत्री पीक विमा योजना, जिल्हा रुग्णालय आदी विषय मांडले.

**'गाव तिथे स्मशानभूमी'साठी निधी देणार**

प्रत्येक गावामध्ये स्मशानभूमी असावी, याकरिता 'गाव तिथे स्मशानभूमी' मोहीम जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावांची यादी तयार करून स्मशानभूमी बांधकामाचा प्रस्ताव सादर करावा. या कामांना जिल्हा नियोजन समितीमधून निधी देण्यात येईल. यासोबत ज्या गावांमध्ये जमीन उपलब्ध नाही, अशा गावांमध्ये भूसंपादनासह स्मशानभूमी बांधकामासाठी दुसऱ्या टप्प्यात निधी दिला जाईल. जिल्हा परिषद बांधकाम विभागाने बांधकामाचा आराखडा आणि प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना पालकमंत्री ना. भोसले यांनी दिल्या.

**विविध विषयांवर मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजन करणार**

लातूर जिल्ह्यातील लातूर ते टेंभूर्णी महामार्ग रुंदीकरण आणि पानगाव ते लातूर रस्त्याच्या कामाचा प्रश्न, जलजीवन मिशनची अपूर्ण काम लवकरात लवकर पूर्ण करणे, तसेच जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प, तलाव यांच्या दुरुस्तीच्या कामांबाबत लवकरच मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री म्हणाले. जिल्हा रुग्णालयाच्या जमिनीसाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याबाबत नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीवेळी चर्चा झाली. त्यानुसार संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या असून लवकरच यासाठी निधी उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

**सर्वांना सोबत घेवून जिल्ह्याचा समतोल विकास करणार**

लातूर जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून काम करताना आठवणीत राहतील, अशी विकास कामे करून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याचा आपला प्रयत्न आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधी, प्रशासन यांना सोबत घेवून जिल्ह्याचा समतोल विकास करण्याला प्राधान्य दिले जाईल. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी, त्यांना अपेक्षित विकास अधिक गतीने व्हावा, यासाठी सर्व लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

**भारतीय संविधानाची प्रत देवून उपस्थितांचे स्वागत; मुलींच्या नावाची नेमप्लेट भेट**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनामार्फत घर घर संविधान उपक्रम राबविण्यात येत आहे. यानिमित्त जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह सर्व उपस्थितांचे भारतीय संविधानाची प्रत देवून स्वागत करण्यात आले. तसेच जिल्हा प्रशासनाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या 'माझी मुलगी, माझा अभिमान' उपक्रमांतर्गत सर्व मान्यवरांना घरावर लावण्यासाठी मुलींचे नाव असलेली नेमप्लेट भेट देण्यात आली.

**सन २०२५-२६ करिता ४९० कोटी २९ लाख रुपयांचा प्रारूप आराखडा; जास्तीत जास्त निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करणार**

लातूर जिल्ह्यासाठी सन २०२५-२६ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३६१ कोटी २६ लाख रुपये, जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) अंतर्गत १२५ कोटी रुपये आणि जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) अंतर्गत ४ कोटी ३ लाख रुपये अशा एकूण ४९० कोटी २९ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये जिल्हा विकास आराखड्यासाठी २५ टक्के निधी प्रस्तावित केला असून याअंतर्गत जिल्ह्यात कृषी व संलग्न सेवा, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील विविध कामांवर भर देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ करिता अंमलबजावणी यंत्रणांनी ६८२ कोटी ६८ लाख रुपयांची अतिरिक्त मागणी नोंदविली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्यासाठी जिल्हा नियोजन समितीला जास्तीत जास्त प्राप्त करून घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री ना. भोसले यांनी यावेळी सांगितले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### अर्थसंकल्पाकडून अपेक्षा

भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या एका टप्प्यावर उभी असून, विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी तिला आता हनुमान उडी घ्यायची आहे. पाचव्या-सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर देशातील एकूण महसुली खर्चात वृद्धी झाली; पण विकासासाठीचा भांडवली खर्च मात्र कमी झाला, असे निरीक्षण १५ व्या वित्त आयोगाने नोंदवले आहे. राज्यांच्या वित्तीय आरोग्य निर्देशांकात महाराष्ट्रासारखे प्रगत राज्य चौथ्या क्रमांकावरून सहाव्या क्रमांकावर गेले. अनेक राज्ये सवंग आर्थिक धोरणे राबवत असून, त्यामुळे ती कर्जबाजारी होत आहेत. केंद्र सरकारही ८० कोटी लोकांना मोफत धान्य वाटत असून, त्यामुळे विकासासाठीचा निधी कमी पडत आहे. २०१४-२५च्या नऊमाहीत केंद्राचा भांडवली खर्च १२ टक्क्यांनी घटलेला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन भांडवली खर्चासाठी वाढीव तरतूद करतील. लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतरचा हा त्या अर्थाने पहिलाच अर्थसंकल्प असून, सीतारामन यांनी कोरोनानंतर देशाची अर्थव्यवस्था बर्यापैकी रुळावर आणली.

मागच्या दोन वर्षांत निर्यातदारांना मिळणारे कर्ज घटले. खरे तर, लाल समुद्रात तणावाचे वातावरण असल्याने माल वाहतूक जहाजांचे प्रवासाचे अंतर व वेळ वाढला. त्यामुळे त्यांना अधिक कर्जांची गरज होती. केंद्राची निर्यातदारांसाठी 'इंटरेस्ट इक्वलायझेशन स्कीम' आहे. तिची मुदत वाढवून त्यामध्ये सूक्ष्म-लघू-मध्यम उद्योगांना प्राधान्य द्यावे, असा आग्रह केंद्रीय वाणिज्य खात्यानेच धरला असून, तो योग्यच आहे. देशातील नागरिकांची उपभोग पातळी खालावत असून, म्हणूनच शेती उत्पादकतेच्या वृद्धीसाठी अधिकाधिक गुंतवणूक केली पाहिजे. 'नाबार्ड'च्या अहवालानुसार, शेती उत्पन्न हे एकूण ग्रामीण उत्पन्नाच्या ५० टक्केही नाही. ज्यांच्याकडे एक-दोन एकरच जमीन आहे, त्यांचे उत्पन्न तर फारच कमी. यासाठी कृषी उत्पादकता वृद्धीवर भर द्यावा लागेल. ग्रामीण भागातील कनेक्टिव्हिटीही वाढवावी लागेल. पंजाब, हरियाणासारख्या राज्यांत गव्हा-तांदळाची वारेमाप खरेदी केली जात असून, मोफत वीज व सवलतीत मिळणार्या खतांमुळे त्यांचे उत्पादनही वाढत आहे. त्यामुळे विशिष्ट पिकांचेच उत्पादन जास्त, अशी परिस्थिती उद्भवली असून, भूजल पातळी घटत आहे आणि जमिनीचा कस निघून जात आहे. त्यामुळे किमान हमी भावाच्या धोरणाची (एमएसपी ) फेरआखणी करण्याची गरज आहे.

फळे, भाज्या आणि प्रथिनांचे भाव वाढत असूनही, आपण केवळ तृणधान्यांच्या उत्पादनावरच लक्ष केंद्रित करत आहोत. गेल्या पाच वर्षांत लोकांची विविध बचत मार्गांतील गुंतवणूक सरासरी १२ टक्क्यांनी वाढली असली, तरी खासगी कंपन्यांची गुंतवणूक फक्त सरासरी ६ टक्क्यांनी वाढली. ही गुंतवणूक किमान १० टक्क्यांपलीकडे जात नाही, तोपर्यंत विकासाचा वेग वाढणार कसा? रोजगारनिर्मितीसाठी बांधकाम उद्योगास उत्तेजन दिले पाहिजे. स्वतंत्र भारताचा पहिला अर्थसंकल्प जाहीर झाला, तेव्हा तो होता फक्त १९७ कोटी रुपयांचा. आता अर्थसंकल्पाचा आकार ४७ लाख कोटी रुपयांवर गेला आहे. त्यावेळी देशाची लोकसंख्या ३५ कोटी होती, आज ती १४० कोटी आहे; पण ८० टक्के लोक गरिबीरेषेखाली होते. आज हे प्रमाण ५ टक्क्यांवर आल्याचा अहवाल स्टेट बँकेने प्रसिद्ध केला आहे.

आता आपला झगडा गरिबीशी नसून, सर्व समाजाला सक्षम करण्यासाठीचा आहे. त्यासाठी शेती, कृषी संलग्न व्यवसाय, उद्योग, निर्यात, पर्यावरण, शिक्षण, आरोग्य या सर्व अंगांचा समग्रतेने विचार केला पाहिजे. केवळ विकासदराच्या वाढीवर नव्हे, तर लोकांनी शांत व सुखी जीव जगावे, यासाठी जे जे करायला हवे, त्याचा अर्थमंत्र्यांनी जरूर विचार करावा. गेल्या तिमाहीत देशाचा जीडीपीचा दर ५.४ टक्क्यांवर खाली आला. भारतातील मध्यमवर्गाचा प्रचंड विस्तार झाला असून, या वर्गाकडून बाजारपेठेतील वस्तूंची मागणी कमी नोंदवली गेली. साबण, तेल, पाव, अंडी, दूध अशा सर्व वस्तू महाग झाल्या आहेत. त्यामुळे यावेळी मध्यमवर्गीयांवरील करांचे ओझे कमी केले जाण्याची शक्यता आहे. ज्यांचे वार्षिक उत्पन्न १५ लाख रुपये आहे, अशांवरील कर कमी करण्याचा विचार केला जाऊ शकतो. शिवाय करदात्यांच्या हातात अधिक खर्च करण्यायोग्य पैसे शिल्लक राहावेत म्हणून मूलभूत सूट मर्यादा किमान ५० हजारांनी वाढवायला हवी.

ज्येष्ठ नागरिकांसाठी कर सवलतीची मर्यादा वाढवणे जरुरीचे आहे. तसेच प्राप्तिकर कायद्याच्या कलम २४ व अंतर्गत गृह कर्जावरील व्याजावर जी दोन लाख रुपयांची सूट आहे, ही मर्यादा तीन लाख रुपयांपर्यंत वाढवली जाणे अपेक्षित आहे. 'कलम ८०डी'अंतर्गत ६० वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना आरोग्य विमाच्या प्रीमियमवर २५ हजार रुपये आणि ज्येष्ठ नागरिकांना ५० हजार रुपयांची वजावट मिळते. ही मर्यादा अनुक्रमे ५० हजार आणि ७५ हजार रुपयांपर्यंत वाढवायला हवी. तसे झाल्यास सामान्यांचा आरोग्यावरील खर्चाचा ताण कमी होईल. सरकारने प्राप्तिकर अधिक सुटसुटीत केला पाहिजे. गत अर्थसंकल्पात रोजगारासाठी पंतप्रधान योजना सुरू केली होती. या वेळच्या अर्थसंकल्पातही बेरोजगारी कमी करण्यासाठी काही ना काही उपाय योजावे लागतील. याचे कारण, अपेक्षित विकास दर साध्य झाला नसल्यामुळे देशात रोजगारनिर्मितीचा वेगही मंदावलेला आहे. डिजिटल क्रांतीमुळे होणार्या बदलांचा विचार करावा लागेल.

या क्रांतीमुळे अकौंटिंग, वित्तीय व कायदेशीर अशा अनेक व्यावसायिक सेवा दूर बसून करता येऊ लागल्या आहेत. बाहेरच्या देशांतील अशी अनेक कामे भारतातून केली जातात. गेल्या काही वर्षांत अर्थव्यवस्थेत नवनवीन क्षेत्रांत संधी निर्माण झाली आहे. जगामध्ये एकूण निर्यात उलाढालीच्या ४२ टक्के वाटा सेवा क्षेत्राचा आहे. त्यामध्ये डीडीएस किंवा डिजिटली डिलिव्हर्ड सर्व्हिसेसचा हिस्सा ५६ टक्के आहे. येत्या पाच वर्षांत तो ६६ टक्क्यांपर्यंत वाढणार आहे; पण यासाठी कौशल्यांचा दर्जा वाढवावा लागेल. थोडक्यात, रोजगार वाढवण्यासाठी कंपन्यांना आणखी काही प्रोत्साहन देण्याची गरज आहे. सीतारामन विकसित भारतासाठी अर्थसंकल्पातून नवी दिशा देतील, अशी अपेक्षा आहे.

# बाबासाहेबांचा ३१ जानेवारी १९२० चा मूकनायक १०५ वर्षाचा झाला.

इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे सांगणारा सर्वात जास्त जागृत समाज आज स्वताच इतिहासाच्या आठवणी आचरणाने मोडून काढत आहे.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते,तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते. हे वाक्य वापरून ज्यांनी ज्यांनी पत्रकारिता केली त्यांनी स्वतचे दुकान धंदा मांडला.त्यांचे क्रांतिकारी विचारांची चळवळ उभी करणे हे उदिष्ट कधीच नव्हते.तर स्वताच खूप मोठे थोर विचारवंत होऊन ते सिद्ध करण्याचा धंदा असण्याचा गर्व होता.म्हणूनच त्यांनी इतरांना चळवळीतील नेत्यांना कमी लेखले. त्यामुळेच बहुजन हिताय बहुजन सुखाय हा मध्यम मार्ग जो तो स्वीकारत नाही.मग सर्वच विश्वरत्न सम्राट,बहुजन लोकनायक,जनतेचा महानायक बनण्याचे स्वप्न पाहता पाहता क्रांतिकारी विचारांच्या चळवळी पासून कधी वेगळे पडले कळलेच नाही.यांच्या जन्मा पासून शेवट पर्यंत मी पत्र लेखक,पत्रकार ते स्तंभ लेखक म्हणून राज्यात परिचित झालो.असलो तरी माझी ओळख असंघटीत कामगार नेता म्हणून ओळख आज ही कायम आहे.मी स्वत मासिक,पाक्षिक साप्ताहिक संपादित करून प्रकाशित केले आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक या पाक्षिकाने अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण केली व त्यांना आपल्या अधिकारांची जाणिव निर्माण करून दिली. मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर बिरुदावली म्हणून संत तुकाराम महाराजाच्या खालील ओव्या छापल्या जात असत.

काय करुन आता धरुनिया भीड । नि:शक हे तोड वाजविले ।।१।।
नव्हे जगी कोण मुकियाचा जाण ।सार्थक लाजोनी नव्हे हित ।।२।।

पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये खालील जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली होती.
आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही.परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या इतर वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की,त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची त्यांना पर्वा नसते इतकेच नव्हे तर,केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात.अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच की,कोणतीही एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चटका इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही.समाज ही नौकाच आहे.ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने,अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही.म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करुन आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये.
मूकनायकाच्या पहिल्या अंकातील हा ही मजकूर पुढीलप्रमाणे होता.
हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय.पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की,या मनोऱ्याला शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग नाही.ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे.खालच्या मजल्यातला माणूस कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाही. असा हा हिंदू आणि त्याचा धर्म आहे.

मूकनायक हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी सुरू केलेले मराठी भाषेतील एक पाक्षिक होते. ३१ जानेवारी १९२० रोजी या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला.हे पाक्षिक मुंबईतून प्रसिद्ध होत असे.पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादक केले. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करीत होते.त्यामुळे त्यांना उघडपणे संपादकपदावर कार्य करणे शक्य नव्हते.म्हणून त्यांनी मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांची नेमणूक केली होती.पहिल्या अंकातील 'मनोगत' नावाचा अग्रलेख डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता.पुढील तेरा अंकातही त्यांनी लेख लिहिले.मूकनायकासाठी कोल्हापूरच्या छत्रपती राजर्षी शाहूमहाराज यांनी त्या काळी २,५०० रुपयांची आर्थिक मदत दिली होती. ज्या समाजाच्या समस्या वेदना बाबासाहेब मांडत होते.तो समाज आजच्या सारखा सुशिक्षित नव्हता तर मोठ्या प्रमाणत अक्षर ओळख नसलेला होता.आजच्या अशिक्षित माणसांना अक्षर ओळख आहे.तेव्हा ही हा समाज असंघटीत कष्टकरी कामगार,मजूर,शेतमजूर होता.आज इमारत बांधकाम कामगार,वाहन चालक,सुरक्षा रक्षक,फेरीवाला,अनेक धंद्यातील कुशल कारागीर आहे.मुकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित,गरीब व शोषित लोकांच्या व्यथा त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या.अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी अस्पृश्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे,असे त्यांना नेहमी वाटत असे. ५ जुलै १९२० रोजी आंबेडकर पुढील शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. त्यानंतर ३१ जुलै १९२० पासून मूकनायकाचे संपादक पद ज्ञानेश्वर ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे ह ा े त े.



सध्या मूकनायकाचे १९ अंक उपलब्ध आहेत.त्यांत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वैचारिक लेख आज ही प्रेरणादायी आहेत.मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे ही जाणीव निर्माण केली होती. 'मूकनायक' पत्रात विविध विचार,वर्तमानसार,निवडक पत्रातील उतारे,क्षेम,समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत भारत हे पाक्षिक ३ एप्रिल १९२७ ला सुरु केले होते.ते स्वतः या पाक्षिकाचे संपादक होते. दुसऱ्या अंकापासून 'बहिष्कृत भारता' वर बिरूदावली म्हणून ज्ञानेश्वर महाराजाच्या पुढील ओव्या उद्धृत केलेल्या होत्या.
आता कोंडद घेऊनि हाती। आरूढ पांइये रथी। देई अलिंगन वीरवृत्ती। समाधाने। जगी कीर्ती रुढवी। स्वधर्माचा मानु वाढवी। इया भारापासोनि सोडवी। मेदिनी हे। आता पार्थ निःशंकु होई। या संग्रमा चित्त देई।
एथ हे वाचूनी काही। बोलो नये। आता केवळ संग्राम।संग्रामाशिवाय दुसरे काहीही नाही।
डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशी युद्धप्रेरणा अस्पृश्यांत चेतवीत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र (कर्मभूमी) महाराष्ट्र राज्य होते आणि मराठी ही मातृभाषा लोकभाषा होती. सर्वांना माहिती आहे की, बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड पंडित विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली कि त्या वेळी महाराष्ट्रातील अस्पृश जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समझू शकत होती. मात्र त्याच वेळी महात्मा गांधी आपले एक वृत्तपत्र हरिजन इंग्रजी भाषेत प्रकाशित करत होते. मात्र त्यावेळी अस्पृश जनतेला साधारणपणे इंग्रजी माहिती सुद्धा नव्हती. डॉ.बाबासाहेबांनी जनता हे पाक्षिक सुद्धा सुरू केले होते.या वृत्तपत्राचा पहिला अंक २४ नोव्हेंबर १९३० रोजी प्रकाशित झाले होते.त्यांचे संपादक देवराव विष्णू नाईक होते. त्यानंतर गंगाधर निळकंठ सहस्त्रबुद्धे हे पाक्षिक जनताचे संपादक झाले.पाक्षिक जनताचे पुढे ३१ ऑक्टोबर १९३० ला जनता साप्ताहिक झाले. साप्ताहिक जनता वृत्तपत्राची बिरुदावली म्हणून 'गुलामाला तु गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल' हे वाक्य होते. या वृत्तपत्रातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व निकडीचे प्रश्न चर्चिलेत तसेच जनतेतून विशेष म्हणजे त्यांनी विलायतेहून पाठवलेली पत्रे प्रकाशित झाली होती.१९५५ पर्यंत साप्ताहिक जनता सरू होते.या वृत्तपत्राचे संपादन वेळोवेळी बदलले. कमी त्यात अनियमितपणा निर्माण झाला परंतु तरीही ते खूप दिवस टिकले. ४ फेब्रुवारी १९५६ रोजी साप्ताहिक जनताचे नामकरण प्रबुद्ध भारत असे करण्यात आले होते.१४ ऑक्टोबर,१९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली.बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंत हे पाक्षिक बंद पडले.

११ एप्रिल २०१७ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधीत बाबासाहेबांचे नातू प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी प्रबुद्ध भारत हे पाक्षिक नव्या स्वरूपात पुन्हा प्रकाशित करण्याचे जाहिर केले व १० मे २०१७ रोजी याचा पहिला अंक प्रकाशित झाला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मागासवर्गीय अस्पृश समाजात जनजागृती निर्माण करण्यासाठी अनेक वृत्तपत्रे व पाक्षिकांचे प्रकाशन आणि संपादन केले होते. त्यांना या वृत्तपत्र-पाक्षिकांनी बहुजन चळवळीला पुढे नेण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. खरे तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच बहुजन समाजाच्या पत्रकारितेचे आधार स्तंभ आहेत.हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक संघटना,पक्षाने स्वताचे मुखपत्र असणे आवश्यक असते. असे बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते.ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते. आज आंबेडकरी चळवळीचे मुखपत्र नाही तर प्रत्येक संघटना,पक्षाचे मुखपत्र आहे. सर्वांची विचारधारा एक असली तरी प्रत्येकाचे धेय्य उदिष्ट वेगवेगळे आहेत.त्यामुळेच हजारो पत्रकार,संपादक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची क्रांतिकारी विचारधारा स्वीकारून एकत्र येऊन चळवळीला योग्य दिशा दाखवू शकत नाही.यांची खंत वाटते.इतिहास वाचला तर इतिहास घडविता येतो असे सांगणारा सर्वात जास्त जागृत समाज आज स्वताच इतिहासाच्या आठवणी आचरणाने मोडून काढतात असे लिहावे लागते.सांगा मग बाबासाहेबांचा ३१ जानेवारी १९२० चा मूकनायक १०५ वर्षाचा झाला.आमच्यात किती बदल झाला तर कालचे मुकनायक आज खूप बोलू लागले.३१ जानेवारी १९२० चा मूकनायक १०५ वर्षाचा झाला या शुभ प्रसंगी सर्व सामाजिक बांधिलकीच्या वृतपत्रांना,त्यांच्या भागधारक,जाहिरातदार,वाचक वर्ग,हितचिंतक यांना भावी यशस्वी वाटचालीसाठी हार्दिक अभिनंदन आणि हार्दिक शुभेच्छा

*****

सागर रामभाऊ तायडे,
९९२०४०३८५९,
भांडूप मुंबई.

# मुक्यांना वाचा फोडणारे वृत्तपत्र मूकनायक!

मूकनायक वृत्तपत्राचा १०६वा वर्धापनदिन त्यानिमित्ताने.
वृत्तपत्र हे एक मुद्रीत माध्यमामध्ये शक्तिशाली व प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्रातून आपले मत, विचार, तक्रारी, क्रिया प्रतीक्रिया व्यक्त केल्या जातात. तसेच समाजात होत असलेल्या चांगल्या अथवा वाईट गोष्टीवर प्रकाश टाकल्या जातो.

वृत्तपत्रे हि लोकांच्या जीवनांशी , विचारांशी निगडित आहे.

त्याकाळी मुंबई इलाख्यात जी इतर वृत्तपत्र सुरू होते ते फक्त आपल्या जातीचे हितसंबंध पाहणारी होती.

अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्याय,अत्याचाराबाबत मौन होती.कोणतेही वर्तमानपत्र अस्पृश्यावर होत असलेल्या अन्याय अत्याचाराबाबत,त्यांच्या समस्या व पिडितेबाबत अस्पृश्य समाजाची हि व्यथा कोणी मांडायला तयार नव्हते.

अस्पृश्य समाज हा अज्ञानी,व दारिद्र्याने पिडीत असल्याने त्याकाळी त्यांची वाईट परिस्थिती होती. हि परिस्थिती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिली, ओळखली एक जात दुसऱ्या जातीवर करत असलेला अन्याय खूप अमानुष, अमानवीय होता.तो अन्याय नष्ट करण्यासाठी आणि त्यांना न्याय,निसर्गदत्त हक्क व अधिकार, माणसाला माणसासारखी वागणूक मिळवून देण्यासाठी त्यांनी लढा उभारला.चळवळ उभारली.आणि चळवळीत वृत्तपत्राचे योगदान काय असते याची त्यांना पुर्ण जाणीव होती.

आणि म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी मुंबई मधून मराठी भाषेतील मूकनायक हे पाक्षीक सुरु केले.

इथल्या व्यवस्थेने हजारो वर्षांपासून आवाज दाबून टाकलेल्या समाजाला मूकनायकाच्या रुपाने नवा आवाज मिळाला.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता म्हणजे मानव मुक्तीचा एक धगधगता ज्वालामुखीच!त्यांची लेखणी जेवढीआक्रमक तेवढीच संयमी,त्यांच्या प्रत्येक लेखातून प्रचंड विद्वत्तेचं दर्शन घडते. पत्रकारितेकरिता असणारी अत्युच्च दर्जाची पात्रता,उच्च कोटीचे तत्वज्ञान,प्रचंड गाढा अभ्यास,सुमद्राचा ठाव घेणारी विश्लेषण क्षमता,भाषासौंदर्य!

मूकनायकाच्या १४व्या अंकात बाबासाहेब लिहतात अन्याय सहन न होणे हेच मनुष्याच्या मनाचे उन्नत स्वरूप होय.

पाक्षिकामध्ये अग्रलेख लिहला कोणतीही एक जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चटका इतर जातीला बसल्याशिवाय राहत नाही.समाज हि नौकाच आहे.ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारुने जाणुनबुजुन इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा, किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतराच्या खोलीत छिद्र पाडले तर सर्व बोटी बरोबर त्यालाही मागून म्हणा किंवा अगोदर म्हणा बुडावे लागणारच.कारण छिद्र पाडणारा सुध्दा त्या नौकेत असतो. एका जातीचे नुकसान करायच्या नादात अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचे सुध्दा नुकसान होणार यात शंकाच नाही.हा इशाराच आपल्या अग्रलेखातून दिला.

मूकनायकाचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रकाशित करण्यात आला. आज १०५ वर्ष झाले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्याय,अत्याचारावर उपाय योजना सुचविण्यावर तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी भूमी नाही.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेल्या मूकनायक पाक्षीकाच्या माध्यमातून अस्पृश्य समाजात जागृती निर्माण झाली.व सोबतच आपल्या अधिकाराची व अन्यायाविरुद्ध लढण्याची जाणीव झाली.असे भले मोठे मुक्यांना वाचा फोडण्याचे काम मूकनायक पाक्षीकाच्या माध्यमातून झाले.

पाक्षिक सुरु केले त्यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर हे परदेशात सिडनेहॅम कॉलेज मध्ये प्रोफेसर म्हणून काम करत होते.व शिक्षण पण घेत होते.तेव्हा मूकनायकाचे काम ज्ञानदेव धृवनाथ घोलप या तरुणावर सोपवले होते.परदेशात शिक्षण घेत असताना सुध्दा ते मूकनायकासाठी बातम्या,लेख पाठवत असत.

या मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी त्यावर बिरुदावली म्हणून तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओवी होत्या.

काय करु आता धरुनिया भीड!
नि:शंक हे तोंड वाजविले!
नव्हे जगी कोण मुकीयाचा जाण!
सार्थक लाजुनी नव्हे हित!

तुकाराम महाराजांच्या या अभंगाप्रमाणे, येथे मुकीयांचा, दीनदलीतांचा, गोरगरीबांचा, पददलितांचा वाली कोणीही नाही. म्हणून मी आता आवाज दिला पाहिजे. बोलले पाहिजे. त्याचवेळी यांचे हित साधल्या जाईल अन्यथा नाही.

आणि म्हणून मूकनायक पाक्षीकाचा मुख्य उद्देश दलित,गरीब,शोषीत लोकांच्या व्यथा,आवाज ब्रिटिश सरकारपर्यंत पोहचवणे हा होता.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखनीच्या माध्यमातून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अत्याचारावर प्रकाश टाकला. आणि समाजाच्या उन्नतीसाठी ब्रिटिश सरकारला काही उपाय योजना सुचवल्या

डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही त्यावेळच्या पत्रकारितेपेक्षा अतिशय प्रतिकुल परिस्थितीशी सामना करणारी म्हणुनच भिन्न स्वरूपाची होती. कारण त्यांना एकाच वेळी अनेक आघाड्यांवर, अनेक समस्यावर लढावे लागत होते. आणि त्यातही आर्थिक पाया भक्कम नसताना वृत्तपत्र चालवणे साधी गोष्ट नव्हती. अशातच परदेशातून शिक्षण संपवून येईपर्यंत ढासळत्या आर्थिक स्थितीमुळे मूकनायक बंद पडले. याचे बाबासाहेबांना खूप दु:ख झाले होते. पुढे त्यांनी १९२७ ला बहिष्कृत भारत, आणि १९३०ला जनता हि पाक्षिक चालू केले.

*************

विनोद सरदार
फुले आंबेडकर विद्वत सभा
मो.नं.९६८९८४७११५

# तहसीलदार किशोर यादव यांचे आवाहन, पात्र लाभार्थ्यांनी अपडेट केलेली कागदपत्रे सादर करावीत

किनवट: शेख शौकत :संजय गांधी व श्रावण बाळ योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी आधारकार्डशी मोबाईल क्रमांक लिंक करुन बँक पासबुक व मोबाईल क्रमांक सादर करावे. अन्यथा लाभार्थ्यांचे अनुदान येणे बंद होईल अशी माहिती तहसीलदार किशोर यादव यांनी दिली असून ठीक ठिकाणी आयोजित केलेल्या कॅम्पमध्ये लाभार्थ्यांनी आपापले अपडेट केलेली कागदपत्रे आणि मोबाईल क्रमांक सादर करावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. सचिव सामाजिक न्माय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डि.बी.टी. द्वारे करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी नांदेड यांनी माहे फेब्रुवारी २०२५ पासुनचे अर्थसहाय्य केवळ डि.बी.टी. पोर्टलवर ऑन बोर्ड व आधार व्हॅलिडेट झालेल्या लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे असे निर्देश दिले आहे. त्यानुषंगाने माहूर तालुक्यातील काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने मंडळ निहाय कॅम्पचे आयोजन करण्यात येत असून आपल्या तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांनी आधार कार्डशी मोबाईल क्रमांक आधार सेंटरवर जाऊन लिंक करुन बँक पासबुक खात्याची झेरॉक्स आणी चालु मोबाईल नंबर तसेच हयात प्रमाणपत्र यापुर्वी सादर केले नाही त्यांनी संलग्म करणे साठी तहसिल कार्यालय माहूर येथे सादर करावा.माहूर वाई बाजार सिंदखेड वानोळा या ठिकाणी दिनांक ३०



ते दि ८ पर्यंत हे कॅम्प चालू राहणार आहेत. सदरील माहिती सादर न करणाऱ्या लाभार्थ्यांचे अनुदान बंद करण्याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. याबाबत सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी व आपले कागदपत्र वर नमुद केलेल्या कॅम्पच्या दिनांकावर आपण स्वत आधार संलग्म् मोबाईल सह हजर राहावे. असे आवाहन तहसिलदार किशोर यादव यांनी केले आहे.

## केज येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ रास्तारोको !

केज/प्रतिनिधी अंतरवाली सराटी येथे गेली सहा दिवस सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील आणि इतर कार्यकर्त्यांच्या समर्थनार्थ गुरुवारी सकाळी १०-३० वाजता येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा-बहुजन समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. मराठा समाजाच्या आरक्षण व इतर समस्यां सोडवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी रोजी आमरण उपोषण सुरू केले होते. सहाव्या दिवशी जरांगे पाटील यांच्यासह इतर कार्यकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. सहाव्या दिवसापर्यंत शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन चर्चा केली नाही. महाराष्ट शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन तात्काळ मागण्या मान्य कराव्यात यासाठी केज तालुका सकल मराठा-बहुजन समाजाच्या वतीने येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर केज तहासिलच्या नायब तहसीलदार आशा वाघमारे यांनी आंदोलन स्थळी येऊन निवेदन स्वीकारले व याबाबत



वरिष्ठ पातळीवर कळवण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे प्रातिनिधिक आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी पोलीस तगडा बंदोबस्त ठेवला होता. आंदोलनात दिलीप गुळभिले, हनुमंत भोसले, विनोद शिंदे, शिवाजी ठोंबरे, प्रशांत गुंड, मंगेश देशमुख, राहुल खोडसे, अविनाश इंगळे, हनुमंत घाडगे, बाळासाहेब गलांडे, राधाताई सपकाळ-तपसे, सौ.निर्मला सातपुते, संजना जोगदंड,सौ.कदमताई, सौ.लक्ष्मी भोसले, नवनाथ देशमुख,सूर्यकांत चवरे, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते.

## थंडी संपली असे समजू नका

पुणे : सध्या राज्यातील तापमानात चढ-उतार जाणवत असून थंडी संपून आता महाराष्ट्र तापणार आहे. महिनाअखेरपासून महाराष्ट्रातीलतापमान वाढणार असून सरासरी प्रत्येक जिल्ह्यातील तापमान वाढत आहे. तसेच फेब्रुवारीमध्ये थंडीची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून थंडी कायमची गायब झाली असे समजू नये, अशी माहिती सेवानिवृत्त हवामानशास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

राज्यात कोकण वगळता उर्वरित महाराष्ट्रातील २९ जिल्ह्यात, कमाल ३२ ते ३५ तर किमान तापमान १३ ते २० डिग्री से. ग्रेड दरम्यान जाणवत आहे. ही दोन्हीही तापमाने सरासरीच्या ३ ते ५ डिग्री से. ग्रेडने अधिक आहेत. त्यातही विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, नगर, महाबळेश्वर, कोल्हापूर, सातारा, सोलापूर तसेच मराठवाड्यातील छ. संभाजीनगर, परभणी, विदर्भातील अकोला, अमरावती, ब्रम्हपुरी, नागपूर, वर्धा, यवतमाळ येथील दुपारी ३ चे कमाल व पहाटे ५ चे किमान तापमान हे सरासरी तापमानापेक्षा ३ ते ५ डिग्रीने वाढलेले आहे.

पुणे व अकोला(विदर्भ) शहराचे कमाल तापमान तर जवळपास ३६ आहे आणि सोलापूरचे ३५ तर नाशिकचे ३४ डिग्री पर्यंत पोहोचले आहे. नाशिक, पुणे अकोला शहरांची ही वाढ जवळपास सरासरीच्या ५ डिग्रीने अधिक आहे. संपूर्ण विदर्भातही कमाल तापमात चांगलीच वाढ झालेली जाणवत आहे. जळगांवसह खान्देशांतील तीन जिल्ह्यात मात्र उष्णता विशेष अशी अत्याधिक जाणवत नाही.

कशामुळे वाढली ही उष्णता?

वाढलेल्या उष्णतेचा संबंध लगेच काही अभ्यासक ग्लोबल वार्मिंगशी जोडून मोकळे होतात.

## केज पंचायत समितीचे फर्निचर वर्षेभर धुळखात पडुन असल्याची बातमी प्रसिद्ध कताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात

केज / प्रतिनिधी केज पंचायत समिती मध्ये गेल्या वर्षभरापासून फर्निचर धुळखात पडल्याची बातमी आमच्या दैनिक महावृत्त यांनी वर्तमानपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की गेल्या वर्षभरापासून लाखो रुपयांचे फर्निचर पंचायत समितीच्या आवारात धुळखात पडलेले होते यावर गुटखा पान मसाला खाऊन पिचकारी मारून व रिकाम्या पाण्याच्या बाटल्या टाकून फर्निचरचे नुकसान होत असल्याचे आमच्या प्रतिनिधीच्या निदर्शनास आल्याने आम्ही आमच्या दैनिक महावृत्त या वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध करताच पंचायत समिती कार्यालयाचे कर्मचारी व गुत्तेदार यांनी तात्काळ बातमीची दखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याचे निदर्शनास आले.यामुळे लाखो रुपयाचे फर्निचर सामान आता वापरात येत असल्याने



नागरिकांतून न्युज चॅनल व दैनिकाच्या वर्तमानपत्रातून बातमी प्रसिद्ध केलेल्या संपादक व पत्रकार बांधवांचे आभार व्यक्त केले जात आहे.

## सरकारची फसवणूक करणाऱ्या पालिका, पोलीस अधिकाऱ्यांविरोधात कालीपुत्र डॉ. सचिन कदम यांचे अमरण उपोषण

नवी मुंबई / के.एच. हनवते :- नवी मुंबईतील घणसोली भागात महालक्ष्मी अपार्टमेंट डी मार्टसमोर बांधकाम करण्यात आलेली पहिली वाटर फॉल इमारत धोकादायक असतानाही इमारतीतील सर्व रहिवाशांना बाहेर काढले जात नाही, एकाच मीटरवर ४ वर्ष पासून वीज पुरवठा सुरू असून प्रलंबित वीज बील, सरकारी टॅक्स भरला जात नाही, त्यामुळे सरकारची लाखो रुपयांची फसवणूक झाली आहे, यामध्ये नवी मुंबई महापालिका अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांच्या संगनमताने विकासक, जमीन मालक जबाबदार असून त्यांच्यावर कारवाई करावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते कालीपुत्र डॉ. सचिन कदम यांनी बेलापूर महापालिकेसमोर अमरण उपोषण सुरू केले आहे. नवी मुंबईतील भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांना निलंबित करीत नाहीत, तोपर्यंत अमरण उपोषण सोडणार नाही, असा इशारा सचिन कदम यांनी प्रशासनाला दिला आहे नवी मुंबईमध्ये बेकायदा बांधकामे केली जात असताना त्याकडे पालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, यामध्ये पालिका टॅक्स अधिकारी विष्णू धनावडे यांच्यावर ही कदम यांनी गंभीर




स्वरूपाचे आरोप करून चौकशीची मागणी केली आहे. एमआयडीसी महापे येथेही अधिकारी वर्ग बेकायदा भ्रष्ट कारभाराला वाव देत असल्याचा आरोप करीत सावकार, कळसकर, राठोड या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी सचिन कदम यांनी या आंदोलनात केली आहे. घणसोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांच्यावरही आरोप करण्यात आले असून बेकायदा सुरू असणाऱ्या संबंधितांवर कारवाई का केली जात नाही? असा संतप्त सवाल सचिन कदम यांनी केला आहे. तसेच उपोषणच्या एक दिवस अगोदर पोलिसांनी उपोषणकर्ते सचिन कदम यांच्यावर खोटा गुन्हा नोंदवला, आंदोलनकर्त्यावर गुन्हा कसा नोंदवला गेला, असा संतप्त सवाल नवी मुंबईकर विचारत आहेत, भर उन्हात बेलापूर महापालिकेसमोर कदम यांनी अमरण उपोषण सुरू केल्याने प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. जोपर्यंत नवी मुंबईतील जनतेला न्याय मिळत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले तरी अथवा तुरुंगात डांबले तरी हे अमरण उपोषण सुरूच राहील ,असा ठाम निर्धार सचिन कदम यांनी केल्याने प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे, याबाबत महापालिका, पोलीस, एमआयडीसी अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही. याप्रकरणी महापालिका आणि पोलीस आयुक्त काय भूमिका घेतात? याकडे संपूर्ण नवी मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

## सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपाययोजना आणि सूचना पुढे याव्यात माजी मंत्री आ. अमित देशमुख

लातूर / प्रतिनिधी :- लातूर येथील मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात देशाच्या, राज्याच्या आणि लातूरच्या अर्थव्यवस्थेवर महत्त्वपूर्ण चर्चा व्हावी. शिक्षण, उद्योग, व्यापार आणि विकास यांसारख्या अनेक विषयांवर अर्थशास्त्रज्ञ आपले विचार मांडून या अधिवेशनातून सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी उपाययोजना आणि सूचना पुढे येतील, असा विश्वास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व्यक्त केला. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशची लातूर याठिकाणी सुरुवात झाली असून या अधिवेशनाचा शुभारंभ सोहळा राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते शहरातील दयानंद सभागृह गुरुवार दि. ३० जानेवारी २५ रोजी पार पडला. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, राज्य आणि देशभरातून उपस्थित राहिलेल्या अर्थशास्त्र अभ्यासकांचे करुन गतिमान पद्धतीने विकसित होत असलेल्या लातूरमध्ये हे अधिवेशन आयोजित केल्याबद्दल संस्थाचालकांचे आभार व्यक्त केले. दयानंद शिक्षण संस्थेने लातूरात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे आयोजन केले आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. अर्थशास्त्रात शास्त्राला अर्थ असतो अर्थाला देखील अर्थ असतो हे समजून घेण्यासाठी आम्ही या ठिकाणी आलो आहोत. आज या ठिकाणी जगाचा, देशाचा, महाराष्ट्राचा तसेच लातूरच्या देखील अर्थशास्त्राचा उहापोह केला जाणार आहे. देशातील व राज्यातील अलीकडच्या आर्थिक व्यवस्थेवर आपणाला टिप्पणी आज नक्कीच करता येईल. राईट टू



एज्युकेशन कायदा माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात करण्यात आला आणि मागील काळात भारत सरकारने शिक्षणावर जीएसटी आकारण्याचा निर्णय घेतला हे दुर्दैवी आहे, एकीकडे शिक्षण मोफत आहे असे म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूला शैक्षणिक साहित्यावर टॅक्स आकारायचा हे कितपत योग्य आहे असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, शिक्षणावरील जीएसटी कर आकारण्याचा मुद्दा मी विधानसभेत मांडणार आहे तर लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे हा मुद्दा लोकसभेत मांडतील. उद्योग व्यापाराच्या सेवेची तुलना शिक्षणाशी करता येणार नाही शिक्षण हे दान आहे. देशाचे व राज्याचे अर्थशास्त्र योग्य दिशेने मार्गक्रमण करत असेल तर सर्व घटक आनंदी असतात आणि म्हणून अर्थशास्त्रज्ञांनी लातूरसाठी आम्ही काय करावे याचे आम्हाला मार्गदर्शन करावे असे सांगून त्यांनी या राष्ट्रीय परिषदेला शुभेच्छा दिल्या. तसेच अधिवेशनाच्या दरम्यान होणाऱ्या विचारमंथनातून सामान्य माणसाच्या जीवनात बदल घडवण्यासाठीचे उपाय आणि सूचना पुढे येतील असा विश्वास या प्रसंगी बोलताना व्यक्त केला. यावेळी उद्घाटक म्हणून लॉर्ड मेघनाथ देसाई, कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रो.डॉ.अनिलकुमार वावरे, परिषदेचे स्वागताध्यक्ष तथा दयानंद शिक्षण संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्रो.डॉ. अविनाश निकम, डॉ.मारोती तेगमपुरे, डॉ. राहुल म्होपरे, डॉ.बालाजी घुटे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड आदीसह मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध पदाधिकारी सदस्य प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी विद्यार्थी संशोधक उपस्थित होते.

# लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी निधीचे समन्यायी पद्धतीने वाटप व्हावे

लातूर / प्रतिनिधी :- माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची लातूर शहरातील बार्शी रोडवरील नवीन जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हा नियोजन समिती बैठकीला उपस्थिती. ही बैठक राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. जिल्हाधिकारी कार्यालय येथील संविधान उद्देशिका प्रतिकृतीचे मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. यावेळी दूरदर्शन प्रणाली द्वारे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, पालक सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे आदीसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नव्या उमेदीच्या छत्रपती शिवेंद्रसिंह अभयसिंह राजेभोसले यांना जबाबदारी मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले, माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब आणि माजी मंत्री आदरणीय छत्रपती अभयसिंह राजेभोसले यांचे अत्यंत स्नेहाचे, जिव्हाळ्याचे संबंध होते, त्यांच्या सातारा येथील अजिंक्यतारा साखर कारखान्याची प्रेरणा घेऊनच लातूर येथे मांजरा शेतकरी साखर कारखान्याची उभारणी झाली आणि त्यातून या जिल्ह्याचा कायापालट झाला आहे या आठवणींना




उजाळा देऊन छत्रपती शिवेंद्रसिंह राजेभोसले लातूर जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेत पक्षाभिनवेश बाजूला ठेवून सकारात्मकतेने निर्णय घेतील असा विश्वास यावेळी व्यक्त केला. अत्यंत गतीने प्रगतीच्या वाटेवर मार्गक्रमण करीत असलेल्या लातूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने, कोणताही भेदभाव न करता समन्यायी पद्धतीने निधीचे वाटप करण्यासाठी नूतन पालकमंत्री पुढाकार घेतील. विकास कामासाठी येणारा निधी त्याच कामावर योग्य पद्धतीने खर्च होईल, या निधीमध्ये कोणत्याही पद्धतीचा गैरव्यवहार होणार नाही, त्याचबरोबर जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने ही प्रयत्न होतील, एकंदरीत लातूर जिल्ह्याचा लौकिक पूर्वीप्रमाणेच कायम राहील असा विश्वास या प्रसंगी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. लातूर जिल्ह्यातील सध्या प्रगतीपदावर असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच नियोजित प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी नूतन पालकमंत्री पुढाकार घेतील अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त केली.लातूर जिल्हा आता अनेक राष्ट्रीय आणि राज्य महामार्गाने जोडला गेला आहे उर्वरित कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, लातूर विमानतळ विस्तारीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून येथून उडान योजनेत विमानसेवा सुरू करावी, जिल्हा रुग्णालयाच्या उभारणी कामाला आता गती द्यावी. उद्योग, व्यापार आणि शिक्षणाचे केंद्र म्हणून नावारूपाला आलेले लातूर आता आरोग्यसेवेचे केंद्र म्हणून पुढे येत आहे त्यामुळे त्यासाठी आवश्यक असणाऱ्या पूरक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, शेती उत्पादन वाढीच्या दृष्टीने वीजपुरवठा नियमित राहील याची दक्षता घ्यावी, उद्योजकानाही वीजपुरवठा सुलभ पद्धतीने मिळण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत त्यात लक्ष घालावे, सिकंदरपुर व एमआयडीसीतील वीज उपकेंद्र उभारणीला प्राधान्य द्यावे.लातूर जिल्ह्यातील शेतकरी प्रयोगशील असल्यामुळे येथे फुले, फळे आणि भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत आहे, ही बाब लक्षात घेऊन यासाठीच्या स्वतंत्र बाजारपेठ निर्मितीसाठी शहराच्या जवळपास जागा उपलब्ध करून द्यावी, त्याचबरोबर दयानंद गेट समोरील आणि गंजगोलाई भागातील भाजीपाला, फळे विक्रेत्यांसाठी त्वरित पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी आदी मागण्या या बैठकीदरम्यान माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केल्या. लातूर शहर व जिल्ह्यातील मूलभूत सोयी, सुविधा आणि विकास प्रकल्पाच्या संदर्भानेही कांही निवेदनेही पालकमंत्री महोदयांकडे यावेळी सादर केली आहेत. पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी माडलेल्या सर्व विषयांना सकारात्मक प्रतिसाद दिला आपण सर्व लोकप्रतिनिधी मिळून काम करूया अशी ग्वाही त्यांनी दिली.

## सारणी (आ.) येथे आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सारणी (आ.) येथे आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे. या हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. छायाताई खरात यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. प्रत्येक वर्षी आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या सौ.छायाताई खरात या अनेक उपक्रम घेत असतात त्याचाच एक भाग म्हणून महिलांसाठी हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ग्रामीण भागातील महिला या शेतातील व घरकामात व्यस्त असतात त्यांना घराबाहेर कार्यक्रमास बाहेरगावी जाण्यासाठी वेळ मिळत नसतो म्हणून सामाजिक कार्यकर्त्या छायाताई खरात यांनी महिलांना एकमेकीशी संवाद साधता त्याचबरोबर विचारांची देवाणघेवाण व्हावी या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला याही पुढे छायाताई खरात यांनी असे विविध उपक्रम घ्यावेत असे महिलांनी प्रतिक्रिया दिल्या



आहेत व त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे. यावेळी संस्थापक अध्यक्षा छायाताई खरात रोहिणी खरात, सरस्वती खरात, मनीषा खरात, सुरेखा खरात,उषा खरात, माया खरात,मनीषाताई खरात, सुशीला खरात, विद्या बनसोडे, वर्षाताई शिंदे,प्रियंका सोनवणे, अर्चना बनसोडे यांच्यासह इतर ही महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# प्राचार्य डॉ. संजय गवई राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्काराने सन्मानित.

लातूर :– राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्काराने सन्मानित केल्याने जबाबदारी वाढली असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले. भारतीय दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे व छत्रपती शिवरायांचे तेरावे वंशज तथा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह राजे भोसले यांच्या मार्गदर्शनातून राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांना दलित पँथरचे राज्य उपाध्यक्ष डी. एस. नरसिंगे यांच्या हस्ते सहकुटुंब शाल, सन्मानचिन्ह, मानपत्र आणि पुष्प गुच्छ देऊन नुकताच प्रदान करण्यात आला यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. हा पुरस्कार वितरण सोहळा श्रावस्ती बुद्ध विहार, विक्रम नगर, लातूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड हे उपस्थित होते तर विचारमंचावर देविदास बाबा आचार्य, डॉ. विजय अजनीकर, सुजाता अजनीकर, व्ही. एम. भोसले, विलास घारगावकर, प्रा. शिवशरण हावळे, रणजीत आचार्य, डॉ. राहुल डोंबे, सुनील मांदळे, रुपेश गायकवाड, राहुल कांबळे, कुसुम बानाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्व मानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचशील गायक मंडळ, बुधोडा येथील महेंद्र गडेराव, माया गडेराव व चमुनी बुद्ध भीम गीते गाऊन उपस्थितांची मने जिंकली.



यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. संजय गवई म्हणाले की, सामाजिक कार्याची मनस्वी तळमळ असल्याने मी सातत्याने कार्य करीत राहिलो. अहंकार न बाळगता माणसे जोडत राहिलो. त्यामुळे सामाजिक चळवळीमध्ये जीवाभावाचे अनेक मित्र, सहकारी तयार झाले. त्यांना सोबत घेऊन सामूहिकपणे समाजकार्य करण्यातच मला समाधान वाटते. हा आपण केलेला सन्मान केवळ एक व्यक्ती म्हणून माझा एकट्याचा नव्हे तर आंबेडकरी विचाराच्या समग्र कार्यकर्त्यांचा आहे असे मी मानतो. येणाऱ्या काळातही मला आपल्याकडून भरभरून प्रेम, शुभेच्छा, आशीर्वाद मिळावेत हीच अपेक्षा आहे. अध्यक्षपदावरून बोलताना माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड म्हणाले की, ज्या समाजामध्ये सद्गुणांचा सत्कार होतो. त्या समाजाचे भवितव्य उज्वल असते. बिन बांधिलकीची प्रवृत्ती घातक स्वरूपाची ठरते. प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्याकडे आपण केवळ एक व्यक्ती म्हणून नव्हे तर एक सामाजिक कार्यकर्ता, विचार दृष्टिकोन म्हणून पाहतो. लोकशाहीमध्ये संघटनात्मक शक्तीच्या जोरावर जो वर्ग आपला प्रभाव निर्माण करण्यात यशस्वी होतो. त्या वर्गाच्या प्रश्नांची सोडवणूक होऊ शकते. हे ओळखून उपेक्षित समाज घटकांनी सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय बनावयास हवे. लहान मोठ्या संघटनांनी एकत्रित येऊन व्यापक लढा उभा करावयास हवा. हे स्पष्ट करून त्यांनी आंबेडकरी चळवळीचा धावता आढावा घेतला. या कार्यक्रमाला डॉ. लहू वाघमारे, प्रा. नागोराव कांबळे, धम्मपाल सावंत, आर. पी. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. कल्याण कांबळे, आनंद डोनेराव, प्रा. संजय गायकवाड, प्रा. विशाल लामतुरे, ममता गवई, संयम गवई, सुमित गवई, सार्थक गवई यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज मांदळे यांनी केले तर मानपत्र वाचन डॉ. राहुल डोंबे यांनी केले आणि आभार सुनील मांदळे यांनी मानले. कार्यक्रमाला लातूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कालकथित : मधुकर हनवते यांचे दुःखद निधन



आदिलाबाद / प्रतिनिधी :– कालकथित मधुकर हनवते वयवर्ष ५८ (बिटरगांवकर) हल्ली मुक्काम आदिलाबाद (तेलंगणा) येथे दिनांक : २७/०१/२०२५. रोजी अकस्मात दुःखद निधन झाले आहे, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, (मुली), दोन सुना, नाती – नातवंड असा मोठा परिवार आहे, आपल्या सर्वांचे लाडके अब्बा काळाच्या पडद्याआड कायमचेच निघून जाण्याने समस्त हनवते परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे या दुःखात आम्ही सारे मुंबईसह – बिटरगांवकर सामील आहोत, अमचा एक मायचा अधारस्तंभ कायमचाच काळाच्या पडद्याआड निघून गेल्याने आम्ही सारे पोरके झालो आहोत..! अशा शब्दांत नेरूळ नवी मुंबई पत्रकार – कल्याणराव एच. हनवते यांनी अब्बांच्या चरणी भावपूर्ण श्रध्दांजली व विनम्र अभिवादन करून विनंती करतो की, कालकथित मधुकर हनवते (अब्बा) यांचा पुण्यानुमोदन – जलदान विधी रविवार दि. ०२/ फेब्रुवारी /२०२५ रोजी वेळ – सकाळी ११:०० वाजता त्यांच्या निवासस्थानी (बुध्द विहार) डॉ. बी.आर. आंबेडकर नगर आदिलाबाद (तेलंगणा) येथे करण्यात येणार आहे, तरी सर्व बौद्ध उपासक व उपासिका व नातेवाईक यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून भावपूर्ण श्रद्धांजली व्हावी ही विनंती, शोकाकुल समस्त हनवते परिवार

# वाशीम येथे मूकनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन कार्यक्रम उपस्थित राहण्याचे स्वागताध्यक्ष अनिल ताजने यांचे पत्रकार बांधवांना आवाहन

आंबेडकरी चळवळीतील पत्रकारांचा सत्कार कार्यक्रमात जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीतील पत्रकारांचा सत्कार करण्यात येणार असून यामध्ये विशाल राऊत, सिद्धांत जुमडे, अजय चोथमल, अनिल तायडे, चंद्रकांत गायकवाड, दादाराव गायकवाड, सुनील भगत, संदीप कांबळे, फुलचंद भगत, राहुल जुमडे, प्रदीप खंडारे, सागर अंभोरे, ज्ञानेश्वर वरघट, नागसेन पखाले, प्रकाश चक्रनारायण, गौतम भगत आदी पत्रकारांचा मान्यवरांच्या शुभहस्ते संविधान ग्रंथ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

वाशीम / प्रतिनिधी : – विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज जागृतीसाठी सुरू केलेल्या मूकनायक ह्या पाक्षिकाला १०५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त ३१ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता स्थानिक पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्समधील चिंतामणी कॉन्फरन्स हॉलमध्ये मूकनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन कार्यक्रम व पत्रकार सत्कार ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील पत्रकारांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष अनिल ताजने यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष पत्रकार विनोद तायडे राहतील.कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिप सिईओ अधिकारी वैभव वाघमारे, पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पांडुरंग ठोंबरे, जिल्हा माहिती अधिकारी यासेरुद्दीन काझी यांच्यासह प्रमुख वक्ते म्हणून मुंबई येथील जेष्ठ पत्रकार सागर तायडे यांची उपस्थिती राहील. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून प्रसिध्द स्त्रीरोग तज्ञ डॉ.तुषार गायकवाड, माजी जि.प.सदस्या सौ. कल्पना राऊत,विदर्भवादी नेते दत्तराव धांडे,समाजसेवक आशिष इंगोले, नारी शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्षा संगीता इंगोले, समाजसेवक धनंजय घुगे, म. रा. पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी, मेडशी ग्राम पंचायतचे सरपंच शेख जमीर शेख गणिभाई, दलित मित्र गोपाळराव आटोटे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष माधवराव अंभोरे, श्रमिक पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष नितीन पगार, वाशिम जिल्हा वृत्तवाहिनी संघाचे विठ्ठल देशमुख, व्हॉईस ऑफ मिडियाचे जिल्हाध्यक्ष भागवत मापारी, साप्ताहिक माध्यम प्रतिनिधी संदीप पिंपळकर, संघमित्रा धम्मसेवा महिला मंडळ अध्यक्षा प्रतिभाताई सोनोने, प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सिध्दार्थ देवळे, माणिकराव सोनोने, राजीव दारोकार, अ. भा. शिक्षक संघटनेचे विजय मनवर, पिरिपाचे जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखडे,मा.



जि.प. सदस्य विनोद पट्टेबहादूर, समाजसेविका वैशाली खोब्रागडे, सत्यमवे जयते फाउंडेशनचे अध्यक्ष परमेश्वर अंभोरे, समाजसेवक अनंतकुमार जुमडे, ॲड. संजय इंगोले, कास्ट्राईब कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष हेमंत तायडे आदी मान्यवरांची उपस्थिती राहील. तरी कार्यक्रमाला जिल्ह्यातील पत्रकारांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष अनिल ताजने, मार्गदर्शक बबनराव खिल्लारे, सुनिल कांबळे, सुधाकर पखाले, राजाभाऊ इंगोले, आयोजन समिती अध्यक्ष विनोद तायडे, उपाध्यक्ष संतोष वानखडे, माणिकराव डेरे, रवी अंभोरे, विनोद डेरे, बंडू इंगोले, किरण पखाले, कार्याध्यक्ष पप्पू घुगे, सचिव राजकुमार पडघान, सहसचिव डॉ. माधव हिवाळे, कोषाध्यक्ष संदीप डोंगरे, प्रसिद्धीप्रमुख ज्योती इंगळे, सदस्य अजय ढवळे, संजय खडसे, भारत कांबळे, अविनाश भगत, नाना देवळे, सतीश बलखंडे, प्रमोद भगत, श्रीकृष्ण खिल्लारे, संतोष कांबळे, नागेश अवचार, महादेव धवसे, पूजा बनसोड, किरण पडघाण, प्रवीण पट्टेबहादूर आदींनी केले आहे.

# मोबाईल खेळापेक्षा विद्यार्थींनी मैदानी खेळ खेळावेत ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी

लातूर :– हासेगाव येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेच्या लातूर कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने आयोजित वार्षिक क्रीडा उत्सव खेळ भरारी २०२५ चा शुभारंभ महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या हस्ते झाला. यावेळी सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांनी आपण आपल्या आयुष्यात जिद्द बाळगून ध्येय साध्य करावे तसेच मोबाईल फोन चा वापर कमी करुन मैदानी खेळाकडे सुधा लक्ष द्यावे असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास धानोरा येथील सरपंच श्री. सूर्यकांत मुसळे सर, श्री वेताळेश्वर बावगे (सचिव, श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था), मा. श्री. वैजनाथ राठोड (हसेगाव सरपंच), गोरे सर (ज्ञानसागर विद्यालय, हसेगाव), आणि मुलगे सर यांचीही मान्यवर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची प्रस्तावना नंदकिशोर बावगे सर यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रद्धा तरके आणि भक्ती परळे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या क्रीडा महोत्सवाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, आणि सामाजिक विकासाला प्रोत्साहन देणे असून, खेळाच्या माध्यमातून नेतृत्वगुण, कर्तव्यनिष्ठा, आणि संघभावना विकसित करण्याचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लातूर कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्य, प्राध्यापक, आणि कर्मचारी वर्गाने मोलाचे योगदान दिले.



# जिल्हाधिकारी कार्यालयातील संविधान उद्देशिका प्रतिकृती, जनसंवाद कक्षाचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

## घर घर संविधान, सात कलमी कृती आराखडा अंतर्गत उपक्रम

लातूर :– भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्य शासनाने सुरु केलेल्या घर घर संविधान अभियानानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान उद्देशिकेची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिलेल्या सात कलमी कृती आराखडा अंतर्गत जनसंवाद कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या संविधान उद्देशिका प्रतिकृतीचे व जनसंवाद कक्षाचे उद्घाटन आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते झाले. आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, पालक सचिव मनीषा म्हैसकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, सार्वजनिक बांधकाम



विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. राज्य शासनाने सुरु केलेल्या घर घर संविधान अभियानानिमित्त लातूर जिह्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्वागतला बुके ऐवजी संविधान देवून प्रत्येक घरामध्ये संविधान पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच कार्यालयाच्या दर्शनी भागात संविधानाच्या उद्देशिकेची प्रतिकृती लावण्याच्या सूचनाही कार्यालयांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात तयार करण्यात आलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीचे उद्घाटना पालकमंत्री ना. भोसले यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमांतर्गत कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जनसंवाद कक्षाची निर्मिती जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आली असून या कक्षाचे उद्घाटनही पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले.

# शेरा ग्रामस्थांचे विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु गटविकास अधिकारी जाधव व कनिष्ठ अभियंता उडते यांना निलंबित करण्याची मागणी

लातूर / प्रतिनिधी : – रेणापूर तालुक्यातील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जाधव व कनिष्ठ अभियंता बांधकाम उडते यांना तात्काळ निलंबित करून त्यांच्या कार्यकाळातील व शेरा ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती योजना अंतर्गत करण्यात आलेल्या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित देयके थांबवण्यात यावे अशी मागणी शेरा ग्रामपंचायतचे उपसरपंच व सदस्यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी ,कार्यकारी अभियंता बांधकाम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे . निवेदनात असे म्हटले आहे की, रेणापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव व कनिष्ठ अभियंता (बां.) ए.व्ही. उडते यांना तात्काळ निलंबीत करून, त्यांचेवर शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात यावेत व त्यांच्या कालावधीतील सर्व कामाची व ग्रामपंचायत कार्यालय शेरा ता. रेणापूर येथील सर्व कामाची, दलित वस्ती अंतर्गत बोगस सिमेंट काँक्रीट रस्त्याची क्वॉलिटी कंट्रोल मार्फत चौकशी करून सदरील कामाचे बिले तात्काळ स्थगित करण्यात यावे मौजे शेरा ता. रेणापूर येथील ग्रामपंचायत अंतर्गत १. साहेब सोपान कांबळे ते नवनाथ शिवदास सोनवणे यांच्या घरापर्यंत व २. सुधाकर बळीराम सोनवणे यांच्या घरापासून ते उत्तम किसन कांबळे यांच्या घरापर्यंत च्या कामांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मंजूरी असताना.




तेच काम समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांचेकडून मंजूर करून अत्यंत निकृष्ठ दर्जाचे, बोगस काम केलेले आहे. सदरील काम शासकीय अंदाजपत्रकानुसार न करता आपल्या मनमानी पध्दतीने थातुरमातूर काम करून, जिल्हा परिषद, लातूर कडे कामाची देयक सादर करण्यात आलेली आहेत. सदरील कामाचे देयके देण्यात येऊ नये, अन्यथा, १ फेब्रुवारी पासून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शेरा ग्राम पंचायत चे उपसरपंच जयवंत सोनवणे , ग्रा.पं. सदस्य संतोष सुरेश कांबळे , ग्रामपंचायत सदस्य गोरख रामा पांचाळ ,ग्रामपंचायत सदस्य सुनिता कमलाकर लिंबुरकर ,ग्रामपंचायत सदस्य फरजाना आफसर शेख ,ग्रामपंचायत सदस्य अनिता महादेव केसरे राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष शाहूराज मधुकर सोनवणे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE